भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/०१/२०१७

**१) संगणकाच्या साहीत्याची व नगदी पैशांची चोरी :–**

दिनाक ३०/०१/२०१७ रोजी चे ०७.०० वा. दर. यातिल कोणीतरी अज्ञात आरोपीने सुलोचनादेवी पारधी विदयालय मोहाडी येथिल संघणक कक्षाचे चॅनल गेटचा कुलुप व लाकडी दरवाजाचा कुलुप इंटलॉक तोडुन आत प्रवेश करून यातील संघणक कक्षामध्ये लावलेले एसर कंपनीचे ३ मॉनीटर कि. १८०००/–रू.व एक माऊस कि.१५०/–रू.असा एकुन १८,१५०/–रू.चा माल चोरून नेल्याने फिर्यादी एकनाथ नथ्थुजी उपरीकर वय ५७ वर्ष रा. तिलक वार्ड मोहाडी मुख्याधापक सुलोचनादेवी पारधी विदयालय मोहाडी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५४,४५७,३८०भा.द.वि.अन्वये पोलीस स्टेशन मोहाडी येथे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गि–हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**२) कपाटात ठेवलेले नगदी पैशाची चोरी:–**

दिनांक ३०.१.२०१७ चे १०.३० ते १५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी मिताराम धर्माजी वनवे वय ५५ वर्ष रा. मोगरा शिवनी हा त्याची पत्नी व मुलीसह शेतावर गेला असतांना कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन मागील घराचा दवाजा तोडुन आत प्रवेश करून गोदरेज आलमारीचा कुलुप तोडुन कपाटात ठेवलेले नगदी १९,२००/–रू चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी यांनी कलम ४५४,३८० भादवी. अन्वये पोलीस स्टेशन साकोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३) लाच घेणाऱ्या इसमास अटक:–**

दिनाक ३०/०१/२०१७ रोजी चे १४.०५ वा. दर. यातील आरोपीने तक्रारदार शांताराम अगडे यांना त्याचे सेवानिवृत्ती नंतर स्वग्राम प्रवास भत्ता बिल काढुन देतो असे म्हणुन आपले पदाचा दुरूपयोग करून वाम व भ्रष्ट मार्गाने तक्रारदार यांचे कडुन १०००/–रू लाचेची मागणी केली प्रथम दर्शनी सहमती दर्शवुन सापडा कारवाई वेळी कोणतेही प्रकारचा विरोध न करता १०००/–रू ची लाच रक्कम स्विकारतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोनी.पुल्लरवार ए.सी.बी.यांचे रिपोर्ट वरू पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ७,१३,(१),(ड),१३(२) ला.लु.प्र.कायदा १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.पुढील तपास पोनी. पुल्लरवार ए.सी.बी. पो.स्टे. साकोली हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

**४) अवैध जुगार /दारू अडयांवर धाडी . :–**

दिनांक ३०/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, कारधा, वरठी , गोबरवाही , साकोली लाखनी ,पवनी भंडारा, येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण १८ गुन्हे दाखल करून आरोपीच्या ताब्यातुन ७३ लिटर. हात भट्टी दारू + सडवा + साहीत्य कि. १३,२१०/–रू व ४ लिटर १४० मिलीलीटर देशी दारू कि. ११५०/–रू तसेच जुगारातुन १३,३३४ /–रू असा एकुण कि. २७,६९४/–रू माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.